महाराष्ट्र शासन

# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक १००३६, मुंबई ४०० ००१

www.dvet.gov.in ; desk७@dvet.gov.in ; ०२२-२२६२०६०४/२९३

पत्र क्र.०७/सीटीएस/उत्कृष्ट औ.प्र.संस्था/२०२१/६० दिनांक : 08/02/2021

प्रति,

सहसंचालक,

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,

प्रादेशिक कार्यालय,

मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

विषय:- राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना "उत्कृष्ट औद्योगिक प्रशिक्षण संस्था पुरस्कार"देणेबाबत.

संदर्भ:- शासन निर्णय क्र.आयटीआय-२०१५/प्र.क्र.१४२/व्यशि-३ दि.१७ फेब्रुवारी २०१८

१. राज्यातील उद्योग क्षेत्रातील विविध कामासाठी लागणाऱ्या कुशल मनुष्यबळाचा पुरवठा करणे आणि त्यासाठी युवकांना रोजगाराभिमुख, कौशल्ययुक्त प्रशिक्षण देवून सक्षम बनविणे तसेच औद्योगिक आस्थापनांचा दर्जा, गुणवत्ता व उत्पादन वाढविणे या उदिष्टांसह राज्यात शिल्पकारागीर प्रशिक्षण योजना ही मुळ योजना इतर योजनांसमवेत राबविण्यात येत आहे.

२. सदर योजनांची उत्कृष्ट अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांची दखल घेऊन त्यांना प्रोत्साहन देणे व त्यांचा आदर्श घेऊन इतर संस्थांमध्ये निकोप स्पर्धा वाढून उत्कृष्टतेकडे वाटचाल करणे आवश्यक आहे. यासाठी राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना "उत्कृष्ट औद्योगिक प्रशिक्षण संस्था पुरस्कार" देण्याच्या योजनेस संदर्भाधीन शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

३. दि.१५.०७.२०१९ रोजी "जागतिक युवा कौशल्य दिना" चे औचित्य साधुन प्रशिक्षण वर्ष सन २०१७-१८ साठी विभागीय स्तरावर प्रत्येकी ०१ व राज्य स्तरावरुन प्रथम, व्दितीय व तृतीय अशा एकूण ०९ संस्थांना मा. राज्यपाल यांचे हस्ते तसेच मा. मंत्री, मा. राज्यमंत्री व मा. अपर मुख्य सचिव यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न झालेल्या कार्यक्रमात गौरवान्वित करण्यात आले होते.

४. सदरील कार्यक्रमात सन २०१८ मध्ये "शिल्पकारागीर प्रशिक्षण योजना" व "शिकाऊ उमेदवारी योजना" याअंतर्गत झालेल्या अखिल भारतीय व्यवसाय परीक्षेत व्यवसाय अभ्यासक्रमनिहाय प्रथम, व्दितीय व तृतीय आलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना सन्मानित करुन इतर प्रशिक्षणार्थ्यांना प्रतिकात्मक स्वरुपात पदवीदान करण्यात आले. तसेच विविध कौशल्य स्पर्धेमध्ये विजयी झालेल्या प्रशिक्षणार्थ्यांना देखील ऑनलाईन पध्दतीने गौरवान्वित करण्यात आले.

५. सदर पुरस्कार देण्याची सुरुवात सन २०१७-१८ या प्रशिक्षण वर्षापासून करण्यात आली असून कोरोना विषाणूच्या प्रार्दुभावामुळे सदर योजनेस शासनाच्या निर्देशाप्रमाणे एक वर्षासाठी स्थगिती देण्यात आली होती. त्यामुळे सन २०१८-१९ मध्ये सदर पुरस्कार देण्याची कार्यवाही करणे शक्य झालेले नाही.

६. सद्य:स्थितीत कोरोना विषाणूचा घटता प्रभाव व सर्वत्र सार्वजनिक जीवन पूर्वपदावर येत असताना संदर्भिय शासन निर्णयात उल्लेखित केल्याप्रमाणे आवश्यक कार्यवाही करुन प्रशिक्षण वर्ष सन २०१९-२० मध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या औ.प्र.संस्थांची निवड करुन त्यांना आगामी "जागतिक युवा कौशल्य दिनी" त्यांचा सन्मान करणे नियोजित आहे.

७. संदर्भिय शासन निर्णयात नमुद केलेल्या तरतूदी तसेच यावर्षी करावयाची कार्यवाही या बाबीं लक्षात घेता खालीलप्रमाणे कार्यवाहीची रुपरेषा निश्चित करण्यात येत आहे.

७.१. सर्व शासकीय व खाजगी औ.प्र.संस्थांनी त्यांचे प्रादेशिक कार्यालयांना दि.२६.०२.२०२१ पर्यंत सोबत जोडण्यात येत असलेल्या PPT च्या Formate मध्ये त्यापृष्ठर्थ आवश्यक दस्तऐवजांसह आपले "उत्कृष्ट औ.प्र.संस्था" साठीचे प्रस्ताव (Nomination) सादर करावेत.

७.२. प्रादेशिक कार्यालयांनी प्रथमत त्यांना प्रात झालेल्या प्रस्तावांची छानणी करुन सदरील प्रस्तावात संस्थेमार्फत नमूद करण्यात आलेल्या बाबींची पडताळणी करुन घ्यावी व तद्नंतर त्यातुन निवडलेल्या संस्थांना त्यांनी दिलेल्या प्रस्तावात अनुसरून सादरीकरण (Presentation) करण्यासाठी वेळ देवून प्रादेशिक कार्यालयात पाचारण करावे.

७.३. प्रादेशिक कार्यालयांनी त्यांचे स्तरावर सादरीकरण घेण्यात आलेल्या संस्थांपैकी शासकीय व खाजगी प्रत्येकी ०२ अशा एकूण ०४ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची नावे परिपूर्ण प्रस्तावासह संचालनालयास प्रादेशिक कार्यालयाच्या शिफारशीसह दि.१५.०३.२०२१ पूर्वी व्यक्तीश: सादर करावेत.

७.४. प्रादेशिक कार्यालय स्तरावरुन शिफारस करण्यात आलेल्या संस्थांचे सादरीकरण संचालनालय स्तरावर दि.१५.०३.२०२१ ते ३१.०३.२०२१ या कालावधीत घेण्यात येईल. मा. संचालक यांच्या अध्यक्षतेखाली सर्व विभागीय सहसंचालक तसेच संचालनालय स्तरावरील सदरील विषय हाताळणारे अधिकारी यांचा समावेश असलेल्या समितीसमक्ष Nominated संस्था सादरीकरण करतील.

७.५. संचालनालय स्तरावरील समितीमार्फत निश्चित करण्यात आलेल्या विभागीय स्तरावरील प्रत्येकी ०१ व राज्य स्तरावरुन निवड करावयाच्या प्रथम, व्दितीय व तृतीय अशा एकूण ०९ संस्थांची यादी संचालनालयाच्या शिफारशीसह संदर्भिय शासन निर्णयानुसार मा. सचिव, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग यांचे अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीसमोर ठेवण्यात येईल.

८. "उत्कृष्ट औ.प्र.संस्था" गुणगौरव कार्यक्रम दि.१५.०७.२०२१ रोजी "जागतिक युवा कौशल्य दिनी" करावयाचे नियोजित असून सदरील कार्यक्रमासाठी संस्था निवडीची कार्यवाही विहित कालमर्यादेत होणे क्रमप्राप्त आहे. सबब सर्व संस्थांनी व प्रादेशिक कार्यालयांनी सदरील कार्यवाही प्राधान्याने व विहित कालमर्यादेत करावी.

(दीपेन्द्र सिंह कुशवाह भा.प्र.से)
संचालक

प्रत :

१. सर्व जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी
२. प्राचार्य, सर्व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था
३. प्राचार्य, सर्व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था